# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### बुलढाणा जिल्हयातील खाजगी संस्थांचे अध्यापक विद्यालये बंद पडण्याच्या मार्गावर असल्याबाबत

**(१) ३४८९४ (१७-०१-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डी.एड.धारक विद्यार्थ्यांना मागील काही वर्षात सेवेची नसलेली हमी, शिक्षकांना लागणारे लाखो रुपये यासह इतर कारणामुळे भावी शिक्षक होण्यासाठी अनेक विद्यार्थी नाराज असल्याने बुलढाणा जिल्हयातील खाजगी संस्थांचे अध्यापक विद्यालये बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१३-१०-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे. अध्यापक विद्यालयांची एकुण प्रवेश क्षमता व शिक्षक संवर्गातील उपलब्ध रोजगार यांचे प्रमाण अत्यंत व्यस्त असल्यामुळे, विद्यार्थी संख्येअभावी अध्यापक विद्यालये बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

(२) व (३) शिक्षक संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### उरण (जि.रायगड) तालुक्यातील रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत

**(२) ४०७१३ (१८-०४-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील विविध विभागांच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर पडलेल्या मोठया खडड्यांमुळे रात्री अपरात्री प्रवास करताना वाहन चालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी २०२२, रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागातील सिडको, सार्वजनिक बांधकाम विभाग, ओएनजीसी आदि विभागांच्या अखत्यारीतील अनेक रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे अपघात सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी करून उक्त विभागातील रस्त्यांची तातडीने दुरूस्ती करणे तसेच दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. १७६ (2)

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
उरण तालूक्यातील विविध कार्यान्वयीत यंत्रणे अंतर्गत रस्त्याची नियतकालीक देखभाल व दुरूस्तीची कामे करुन रस्ते वाहतूकीकरिता सुस्थित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलातील आरोग्य केंद्रात सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(३) ४१२७८ (०९-०४-२०२२). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)'पेट'परिक्षेत सन २०१८ मध्ये झालेल्या उत्तीर्ण झालेल्या चार विद्यार्थ्यांनी एमडी महाविद्यालयात पी.एच.डी. करण्यासाठी अर्ज केला व महाविद्यालयाकडे पी.एच.डी.ची मान्यता असल्याने मुलाखती घेऊन त्यांचे अर्ज विद्यापीठाकडे पाठवले परंतु ते विद्यापीठाने मंजूर केले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाविद्यालयाला १९८४ मध्ये विद्यापीठाकडून मान्यता मिळाली होती परंतु विद्यापीठाने या मान्यता पत्रावर कालमर्यादा नमूद केलेली नाही, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, विद्यापीठाने सदर महाविद्यालयात प्रयोगशाळा मान्यता नसल्याचे तसेच त्या मान्यतेबाबत विद्यापीठाने पत्रव्यवहार महाविद्यालयाकडे केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पेट ला तीन वर्षाची कालमर्यादा आहे तरी सन २०१८ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा 'पेट' द्यावी लागणार असल्याने, यांस जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, प्रवेश प्रक्रियेच्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२७-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही,
प्राचार्य, एम.डी. महाविद्यालय यांनी दिनांक १७.०२.२०२३ रोजी विद्यापीठ, मुंबई यांना सादर केलेल्या माहितीनुसार सन, २०१८ साठी रसायनशास्त्र विषयात पीएच.डी. साठी महाविद्यालयात अर्ज केलेले व मुलाखती दिलेले विद्यार्थी हे नेट आणि बी.एड. उत्तीर्ण होते. त्यापैकी कोणीही विद्यार्थी पेट परिक्षा उत्तीर्ण नव्हते.
मुंबई विद्यापीठास एम.डी. महाविद्यालयाकडून रसायनशास्त्र विषयात पीएच.डी. विद्यार्थ्यांचे कोणतेही अर्ज प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे सदर अर्ज विद्यापीठाने नामंजूर करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(२) व (३) एम.डी. महाविद्यालयास रसायनशास्त्र विषयाचा पीएच.डी. अभ्यासक्रम चालू करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने दि.१७ डिसेंबर, १९८४ च्या पत्रान्वये प्रथम मान्यता दिली मात्र त्यानंतर सलग संलग्नतेबाबत एम.डी महाविद्यालयाने विद्यापीठाकडे कोणताही पत्रव्यवहार केला नसल्याने त्यासंदर्भाने विद्यापीठानेही एम.डी. महाविद्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही.
(४) डिसेंबर, २०१८ मध्ये संपन्न झालेल्या पेट परिक्षेची कालमर्यादा प्रथमतः ३ वर्षांची म्हणजेच ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंत होती. मात्र, करोना प्रादुर्भावामुळे सन २०२० आणि सन २०२१ मधील लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या हितासाठी मुंबई विद्यापीठाने सदर कालमर्यादा आणखी १ वर्षाने म्हणजेच ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत वाढविली होती. वाढीव कालमर्यादेमुळे सन २०१८ मध्ये पेट उत्तीर्ण विद्यार्थी पीएच.डी. प्रवेशासाठी दि.३१.१२.२०२२ पर्यंत पात्र होते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम शहरातील रोड ओव्हर ब्रीजचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४) ४९३९५ (१६-०८-२०२२). अॅड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाने रोड ओव्हर ब्रीजचे बांधकाम केले असून सदर काम अंदाजपत्रकानुसार झाले नसल्याचे दिनांक २५ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्राप्त तक्रारी वरून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम व इतर अधिकारी यांनी सदर कामाची तपासणी केली असता पुलाची उंची अंदाजपत्रकानुसार कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीअंती पुलाचे निकृष्ठ दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदाराला काळया यादीत टाकून व दंडात्मक कारवाई करून ठेकेदारास पाठीशी घालणाऱ्या वाशिमच्या संबधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-०७-२०२३) :** (१) होय.

(२) नाही. प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन चौकशीमध्ये पुलाची उंची १.४८९ मीटर ने वाढली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

(३) पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले नसल्याने त्यासंबंधी कंत्राटदारावर कार्यवाही करणे प्रस्तावित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देगलूर (जि.नांदेड) येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याने नागरीकांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(५) ४९४२८ (११-११-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि.नांदेड) येथील हंगरगा-तुंबरपल्ली-हणेगाव-कोकलेगाव-रमतापूर-येडूर प्रमुख जिल्हा मार्ग कि.मी. ८/८०० ते १९/०० या रस्त्यांच्या कामांना विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत समाविष्ट करुन मान्यता देण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,यांनी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था लक्षात घेता नागरीकांची गैरसोय दूर होण्याच्या दृष्टीकोनातून दुरुस्ती कामाला तातडीने मान्यता देण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर दुरुस्ती कामाला मंजूरी देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०६-२०२३) :**१) व (२) हे खरे आहे.

हंगरगा-तुंबरपल्ली-हणेगाव-कोकलेगाव-रमतापूर-येडूर ते राज्यसिमा रस्ता प्रजिमा-७८ आहे. सदर रस्ताकरिता नोव्हेबर, २०१८ च्या अर्थसंकल्पातंर्गत कि.मी.८/८०० ते १०/५०० या लांबीला रु.१२० लक्ष रक्कम दुरुस्तीची काम मंजूर असून काम पूर्ण झाले आहे. तसेच सदर रस्त्यावर अर्थसंकल्प जुलै, २०२१ अंतर्गत कि.मी. १०/५०० ते १९/००० मध्ये रु.५०० लक्ष इतक्या किंमतीचे रस्ता सुधारणेचे काम समाविष्ठ आहे. येडूर गावाजवळील नविन पूलाच्या पोचमार्गाच्या

भूसंपादनासाठी मार्च, २०२२ च्या अर्थसंकल्पात रु.९५.०० लक्ष रक्कम मंजूर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत पूलाच्या पोचमार्गाच्या भुसंपादनासाठी सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे. भूसंपादनाचे काम पूर्ण होताच कामाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.
(३) सदर रस्त्यावरील दुरुस्तीची कामे निधी, निकर्ष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुहागर व चिपळूण (जि. रत्नागिरी) तालुक्यातील १४ गावांच्या हद्दीमध्ये प्रस्तावित असलेल्या मार्ग ताम्हाणे एमआयडीसीला चालना देणेबाबत**

**(६) ४९६०६ (१८-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील गुहागर व चिपळूण तालुक्यातील १४ गावांच्या हद्दीमध्ये मार्ग ताम्हाणे एमआयडीसी प्रस्तावित असून याठिकाणी टेक्स्टाईल पार्क, फूड प्रोसेसिंग व लॉजिस्टीक बेस उदयोग उभारण्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्या सुमारास झालेल्या बैठकीत निश्चित करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर एमआयडीसीला चालना दयावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री तसेच मंत्री, उदयोग यांचेकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात आली आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०५-०७-२०२३) :**(१) होय हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
एमआयडीसीला चालना दयावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार श्री. भास्कर जाधव, यांनी दि.१७.०८.२०२२ रोजीच्या पत्राने केली आहे.
(३) सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने दि.२२.११.२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीमध्ये महामंडळामार्फत अधिसूचित मार्ग ताम्हणे येथे किमान ७०० हेक्टर क्षेत्रामध्ये ग्रीन औद्योगिक क्षेत्र(रासायनिक कारखाने वगळून उत्पादन, वस्त्रोद्योग इ.) विकसित करणेसाठी जागा आरक्षित करून त्याबाबतची सुसाह्यतेची पडताळणी व उर्वरित जमीन विनाअधिसूचित करण्यात यावी असे सूचित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील रिफायनरी प्रकल्पाबाबत**

**(७) ४९९४१ (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील रिफायनरी प्रकल्पाच्या विरोधात कोकण परिसरातील नागरीक, सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १९ जुलै, २०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदनाव्दारे मागणी केलेली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी रिफायनरी प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
बारसू सोलगांव पंचक्रोशी संघटना यांनी दि.१९.०७.२०२२ रोजी व विल्ये दशक्रोशी रिफायनरी समर्थक संघटना यांनी दि. १६.०८.२०२२ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांना निवेदने सादर केली आहेत.

(२) मा. मंत्री (उद्योग) यांचे अध्यक्षतेखाली दि.२२.११.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत रत्नागिरी जिल्हयातील संभाव्य रिफायनरी प्रकल्पामधील प्रकल्पबाधित युवक-युवतींना कौशल्यवृध्दीसाठी तथा त्यांच्या रोजगारासाठी आवश्यक ते प्रशिक्षण देणेबाबत, प्रकल्पाच्या जनजागृतीबाबत, प्रकल्पासाठी पाणीपुरवठा योजना राबविणेबाबत व इतर आवश्यक कामाबाबत तसेच भूवनेशवर (ओरीसा) येथील कौशल्य विकास केंद्राच्या धर्तीवर कौशल्य विकास केंद्राची उभारणी करणेबाबत शक्यता पडताळून पाहणीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात करोनामुळे बंद झालेले सुरू करण्याबाबत**

**(८) ५०३८२ (१८-०१-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात करोनामुळे उद्योगधंदे बंद झाल्याने मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी वाढल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बंद पडलेले उद्योग पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१२-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून, साथ रोग अधिनियम, १८९७ चे कलम (२) तसेच आपत्ती व्यवस्थापन नियम २००५ अंतर्गत संपूर्ण राज्यात टाळेबंदी लावण्याचा निर्णय दिनांक २३ मार्च, २०२० च्या आदेशान्वये राज्यातील अत्यावश्यक सेवा वगळता, उर्वरित सर्व उद्योग, कार्यालये, शिक्षण संस्था, सेवा, इ. दिनांक २५ मार्च, २०२० पासून बंद करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला होता.

तसेच टाळेबंदीबाबत दिनांक २५ मार्च, २०२० च्या आदेशान्वये राज्य शासनाने मार्गदर्शक तत्वे निर्गमित करुन टाळेबंदीच्या कालावधीत अत्यावश्यक तसेच वैद्यकीय सेवेशी संबंधित उद्योगधंदे / सेवा वगळता उर्वरित सर्व उद्योगधंदे , शासकीय कार्यालये, शिक्षण संस्था, दुकाने इत्यादी बंद ठेवण्याबाबतचे निर्देश देण्यात आले.

तद्नंतर पुनश्च: प्रारंभ अभियान अंतर्गत दिनांक ३१ मे, २०२० च्या आदेशान्वये कोरोना प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करुन, टप्प्याटप्प्याने टाळेबंदीचे निर्बंध शिथिल करणे व उद्योग, कार्यालये, सेवा, इ.मर्यादित कर्मचारी / कामगार यांच्या उपस्थितीत सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. सद्य:स्थितीत सर्व उद्योग, कार्यालये, सेवा, इ. १००% उपस्थितीत सुरु करण्यास केंद्र शासनाने परवानगी दिलेली आहे.

राज्यातील कोरोना महामारीमुळे प्रभावीत झालेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील उद्योगधंदयांना चालना मिळणेकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत खालीलप्रमाणे सवलती देण्यात आल्या होत्या.
(१) दिनांक २० मार्च, २०२० ते दिनांक ३० जून, २०२१ या कालावधीमध्ये भूखंड विकासाकरिता विकास कालावधी / वाढीव विकास कालावधी तसेच विविध देय शुल्क भरण्याकरिता विनाशुल्क कालावधी वाढवून देण्यात यावा.
(२) दिनांक २० मार्च, २०२० ते दिनांक ३० जून, २०२१ या कालावधीमध्ये दंडात्मक पोटभाडयाची रक्कम वसूल न करता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार ३ टक्के अथवा ०.५ टक्के दराने वसूल करण्यात आले.
(३) सदर कालावधीत प्रत्यक्ष पाण्याचा वापर कमी झाल्याने प्रत्यक्ष रिडींग प्रमाणे पाणी देयक आकारणी सुधारित करण्यात आली. तसेच पाणी देयक भरणा करणेकरिता विलंब शुल्क देखील सुधारित करण्यात आले. तसेच औद्योगिक क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील उद्योग घटकांनी डिसेंबर, २०२१ अखेरपर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची पाणी पुरवठयाची थकबाकी एकरकमी अथवा हप्त्याहप्त्याने संपूर्णपणे माहे डिसेंबर, २०२१ अखेरपर्यंत अदा केली त्यांना पाणी देयकाच्या विलंब शुल्कात ५०टक्के सूट देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

(४) सर्व संबंधित प्राधिकरण यांनी मंजूरी दिलेल्या परवानग्या, अनुज्ञप्त्या, ना-हरकत प्रमाणपत्रे , बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रे, भोगवटा प्रमाणपत्रे , प्राधिकरणांकडे जमा करावयाचे शुल्क, इ. ची लॉकडाऊन/ अनलॉक कालावधीत समाप्त होणारी वैधानिक मुदत परवानगी पत्रात नमूद केलेल्या पूर्व अटींची पूर्तता करण्यासाठी दिनांक ३० जून, २०२१ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

(५) राज्यातील बंद पडलेले उद्योग किंवा काही कारणास्तव जे उद्योजक उद्योग सुरु करु शकले नाहीत,अशा २०,००० चौ.मी.व त्यावरील क्षेत्राच्या भूखंडधारकांना त्यांचे भूखंड , जे उद्योजक ५०० कोटी व त्यापेक्षा जास्त गुंतवणूक करु इच्छितात त्यांना IT / ITES, Nano Technology ,Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्प या प्रयोजनाकरीता हस्तांतरण करण्याकरिता पुनर्जिवन योजना लागू करण्यात आली.

(६) सूक्ष्म व लघू उद्योजकांना गाळे / Flatted Gala बांधण्यास परवानगी दिल्यानंतर त्यामधील २० टक्के सहाय्यभूत सेवा अंतर्गत गाळयांचे व्यापारी प्रयोजनार्थ रुपांतरणाकरीता विनाशुल्क परवानगी देण्याचा निर्णय.

(७) कंत्राटदारांना महामंडळाच्या पायाभूत सुविधांच्या सर्व कामांसाठी कार्यकाल दिनांक १५ मार्च, २०२० ते दिनांक १५ सप्टेंबर, २०२० पर्यंत वाढवून देण्यात आला.

(८) कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर औद्योगिक क्षेत्राचे दर न वाढविण्याबाबतचा निर्णय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ४ फेब्रूवारी, २०२१ व दिनांक ९ ऑगस्ट, २०२१ च्या बैठकीत घेण्यात आला.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**सिंदेवाही ते पाथरी (ता.सावली, जि.चंद्रपूर) रस्त्याच्या बांधकामाबाबत**

**(९) ५०५२६ (१८-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही व सावली तालुक्यातील सिंदेवाही ते पाथरी रस्ता रामा ३७५ सा.क्र. ०/०० ते १८/०० प्रत्यक्ष लांबी २०.६६० किमी, हिरापूर बोथली पाथरी रस्ता प्रजिमा २७ सा.क्र. ०/०० ते १३/४०० प्रत्यक्ष लांबी १३.४० किमी व ब्रम्हपूरी/सावली तालुक्यातील व्याहाड निफंद्रा गांगलवाडी ते ब्रम्हपूरी आरमोरी राष्ट्रीय महामार्ग पर्यंत प्रजिमा २९ व राज्यमार्ग ३७५ राज्यमार्ग ३२२ एकुण लांबी ४९.९७५ किमीचा हा रस्ता रहदारीस अयोग्य असल्याने या रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्री, मंत्री सार्वजनिक बांधकाम, सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे दिंनाक १० व ११ ऑक्टोंबर, २०२२ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामांना रस्ते व पूल दुरूस्ती (SR Program) या योजनेअंतर्गत निधीसह प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत मंत्री सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई व सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे दिंनाक ११ ऑक्टोंबर २०२२ रोजी लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी तालुक्यातील व्याहाड निफंद्रा गांगलवाडी प्रजिमा २९ कि.मी. ०/००ते ३९/५००, सावली तालुक्यातील राज्यमार्ग ३७५ कि.मी. ३१/८०० ते ३३/९०० व ब्रम्हपुरी तालुक्यातील राज्यमार्ग ३२२ कि.मी.१८२/२०० ते १८८/१०० एकूण लांबी ४७.५० कि.मी. या लांबीवर हायब्रीड ॲन्युईटीतंर्गत DPR चे काम २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात रु.५८.७५ लक्ष मंजूर आहेत. सावली तालुक्यातंर्गत रामा ३७५ ची ३१/८५० ते ३३/९००, प्रजिमा २९ ची ७/० ते ११/०, १३/० ते १४/०, १५ ते १८/० व २३/३०० ही लांबी व ब्रम्हपुरी तालुक्यातंर्गत प्रजिमा २९ ची २३/६०० ते ३९/५०० या खराब लांबीमध्ये देखभाल दुरुस्तीतंर्गत खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

चंद्रपूर जिल्हयातील सावली तालुक्यातील हिरापूर बोथली पाथरी रस्ता प्रजिमा २७ सा.क्र.८/०० ते १३/४०० या खराब लांबीमध्ये वार्षिक देखभाल दुरुस्तीतंर्गत खड्डे भरुन रस्ता वाहतुकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. उर्वरित कामे निधी, निकर्ष व प्राधान्यक्रमांने हाती घेण्याचे नियोजन राहील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाकण (जि. पुणे) एमआयडीसीत उद्योजकांना सोई सुविधा पुरविण्याबाबत

**(१०) ५०९३६ (१८-०१-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील चाकण एमआयडीसीत मागील वर्षभरात एकुण ३० उद्योजकांनी कंपन्या बंद केल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाकण एमआयडीसीत खंडित वीजपुरवठा, वाढती गुन्हेगारी, अनधिकृत माथाडी कामगाराची दहशत, रस्त्यांची वानवा, वाढते अपघात, वीज, पाणी, रस्ते, असुरक्षित वातावरण, अग्निशामन केंद्रासारख्या तातडीच्या पायाभूत सुविधा येथील उद्योगांना वेळेत उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या एमआयडीसीतील सर्व उद्योगांना मुलभूत सेवा देण्यासाठी आणि उद्योगपतींना उद्योग चांगल्या वातावरणात निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
चाकण औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्र. १, ३ व ४ ही औद्योगिक क्षेत्रे विकसीत झालेले आहेत. तसेच चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ मधील बहुतांश पायाभूत सुविधांची कामे पूर्ण झाली आहे. सद्य:स्थितीत चाकण औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्र. ४ मध्ये भूखंड क्र. एएम-१ या ठिकाणी अग्निशमन केंद्र कार्यान्वित असून, तेथून चाकण औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्र. १ ते ५ या औद्योगिक क्षेत्रामध्ये अग्निशमन सेवा पुरविण्यात येते.
(३) मऔवि महामंडळाकडून चाकण औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना मुलभूत सेवा- सुविधा जसे रस्ते, पाणीपुरवठा, दिवाबत्ती, वाहनतळ, अग्निशमन केंद्र इत्यादी पुरविण्यात आलेल्या असून, त्यांची देखभाल व दुरुस्ती नियमितपणे केली जाते.
उद्योजकांना उद्योग चांगल्या वातावरणात निर्माण करण्यासाठी व उद्योग सुलभतेसाठी ऑनलाईन सेवाप्रणाली सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात उद्योगांच्या जागा वाटपाच्या प्रस्तावावर निर्णय घेण्याबाबत

**(११) ५१०२७ (१८-०१-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक जिल्हयांमध्ये नवीन उद्योजकांनी जागांची मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे भेंडी (ता. कळवण जि. नाशिक) येथे नवीन औद्योगिक वसाहत एमआयडीसीत स्थापन करणेबाबतची मागणी निवेदनाव्दारे स्थानिक लोकप्रतिनीधींनी माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री व मा. उप मुख्यमंत्री, उद्योग मंत्री यांच्याकडे मागणी केली, आहे हे ही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील उद्योगांच्या जागा वाटपाच्या प्रस्ताव रखडल्यामुळे एकुण ब्याण्णव हजार कोटींची गुंतवणूक थांबली असून सुरगाणा व कळवण या आदिवासी बहुल तालुक्यातून रोजगाराअभावी मोठया प्रमाणात इतर तालुक्यामध्ये स्थलांतर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उद्योगांच्या जागा वाटपाच्या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेऊन याबाबत योग्य ती कार्यवाही होण्याच्या दृष्टीने शासनाची भुमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) मौजे भेंडी, तालुका कळवण, जि. नाशिक येथील गायरान क्षेत्राची दि.१६/०१/२०२३ रोजी प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक यांचे कडून प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्यात आली आहे. त्यानुसार सदर गावांमध्ये २१८.७९ हे. आर. क्षेत्र गायरान असून त्यामधील जास्तीचा भाग डोंगराळ स्वरुपाचा आहे व सदर क्षेत्र एकसलग नसून विखुरलेले आहे.
त्यामुळे सदर तालुक्यात इतरत्र ठिकाणी औद्योगिक क्षेत्रासाठी प्रस्तावित जमिनीच्या उपलब्धतेची पाहणी करून तसा प्रस्ताव करण्याची तजविज महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ठेवली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोट-अकोला (जि.अकोला) महामार्गाच्या पूर्णा नदीवरील पुलाच्या बांधकामाबाबत**

**(१२) ५१७९६ (१८-०१-२०२३). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील अकोट-अकोला महामार्गावरील गांधीग्राम जवळील पूर्णा नदीवरील पूल खाचल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गांधीग्राम गावाजवळील पूर्णा नदीवरील पर्यायी पुलाचे बांधकाम पोच मार्गासाठी आवश्यक असलेल्या जमीन संपादना अभावी मागील ३-४ वर्षांपासून प्रलंबित असून पुलाच्या बांधकामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी शासनाकडे रु ७ कोटी इतक्या निधीची मागणी केली आहे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर पर्यायी पुलाचे बांधकाम पुर्ण करुन वाहतूक पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०७-२०२३) :** (१) राष्ट्रीय महामार्गावरील सदर पुल धोकादायक झाल्याने पुलावरुन वाहतूक दि.१८-१०-२०२२ पासून बंद करण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राष्ट्रीय महामार्गावरील खचलेल्या पुलाच्या बाजूस तात्पुरती स्वरुपात पुलाचे बांधकाम राष्ट्रीय महामार्गामार्फत पूर्ण करण्यात आलेले असून वाहतुक पूर्ववत सुरु करण्यात आलेली आहे. पर्यायी पोच मार्गाचे भूसंपादन करुन बांधकाम मार्च-२०२४ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक एमआयडीसीचे सांडपाणी मनपाच्या ड्रेनेजला जोडणेबाबत

**(१३) ५१८१२ (१८-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड, (जि.नाशिक) येथील एमआयडीसीमधील एसटीपी प्रकल्पातून निघणारे सांडपाणी मनपाच्या ड्रेनेजला जोडण्याबाबत औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक यांनी नाशिक महानगरपालिकेस माहे जून, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान पत्राव्दारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसीतून निघणारे रसायनमिश्रीत पाण्यावर स्वतंत्र एसटीपी प्रकल्पासाठी येणारा खर्च वीस कोटीवरुन साडेसात कोटीवर होवून खर्चात सुमारे चौदा कोटींची एमआयडीसीची बचत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

अंबड, जि. नाशिक येथील सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून निघणारे सांडपाणी महानगर पालिकेच्या ड्रेनेज प्रणालीला जोडण्याच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी मऔविम यांच्या दि. १४/०२/२०२२ च्या पत्रान्वये सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे आऊटलेट नाशिक महानगर पालिकेच्या सांडपाणी पाईपलाईनच्या मॅनहोल चेंबरला जोडण्यास परवानगी मिळणेबाबत नाशिक महानगरपालिकेस विनंती केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या खर्चात बचत होणार आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी मऔविम यांच्या दि. १४/०२/२०२२ च्या पत्रान्वये सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे आऊटलेट नाशिक मनपाच्या सांडपाणी पाईपलाईनच्या मॅनहोल चेंबरला जोडणेस परवानगी मिळणेबाबत नाशिक महानगरपालिकेस विनंती केली आहे. तथापि, आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी दि. ०९/०६/२०२२ च्या पत्रान्वये सदरबाबत निरीचे अभिप्राय प्राप्त करणेबाबत कळविले होते. त्यानुसार निरी संस्थेस याबाबत अभिप्राय कळविण्यास मु.का.अ. मऔविम यांनी दि. ०४/०७/२०२२ च्या पत्रान्वये विनंती केली असता निरीने दि. ०५/०८/२०२२ च्या पत्रान्वये कन्सल्टन्सी चार्जेस रू. ३० लक्ष भरण्याबाबत म.औ.वि.महामंडळास कळविले आहे. त्यानुषंगाने मे. निरी यांना दि. ०६/०९/२०२२ रोजी सांडपाणी प्रक्रिया केंद्राकरीता Consultancy services पुरविण्याचे कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असुन निरी या संस्थेने दि. २६/१२/२०२२ रोजी CETP चे Outlet मनपाच्या सांडपाणी वाहिणीला जोडणेबाबतचा प्राथमिक अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवाल अधिक्षक अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, नाशिक मनपा यांना दि. २९/१२/२०२२ रोजी सादर करण्यात आलेला असून नाशिक महानगर पालिकेकडून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या व्यपगत झालेल्या आणि शेतकऱ्यांच्या विरोधातील भूसंपादन रद्द करणे बाबत

**(१४) ५३३९९ (१८-०१-२०२३). श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील पिंपळगाव वडगाव गुप्ता तालुका नगर येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून नवीन भूसंपादन प्रस्तावासाठी सन २०११ मध्ये कलम ३२ नुसार अधिसूचना काढली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसंपादनास स्थानिक शेतकऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी विरोध केल्यामुळे भूसंपादनाची कारवाई अधिसूचना आल्यानंतर दोन वर्षाच्या आत न झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अतिरिक्त अहमदनगर औद्योगिक क्षेत्राकरिता मौजे वडगाव गुप्ता येथील २२०.७५ हे.आर खाजगी व २३.६७७४ हे.आर सरकारी तसेच पिंपळगाव माळवी येथील २१७.३२ हे.आर खाजगी असे एकूण ४६१.७४७४ हे.आर क्षेत्रास मऔवि अधिनियम, १९६१ चे प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) दि. ०७/०४/२०११ रोजी लागू करण्यात आल्याची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली. त्याअनुषंगाने खाजगी ४३८.०७ हे.आर क्षेत्रास कलम ३२ (२) ची अधिसूचना दि. ०५/०९/२०१२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) मऔवि अधिनियम, १९६१ चे कलम ३२(२) ची अधिसूचना दि. ०५/०९/२०१२ रोजी प्रसिध्द झाल्यानंतर संबंधित भूधारकांच्या तीव्र विरोधामुळे सदर क्षेत्राची संयुक्त मोजणी व कलम ३२ (१) ची कार्यवाही होऊ शकली नाही. भूसंपादनास भूधारकांचा तीव्र विरोध असल्याने विनाअधिसूचित करणेबाबतचे स्वयंस्पष्ट अभिप्राय उपविभागीय अधिकारी, अहमदनगर यांनी दि. ०५/०८/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेले आहेत. तसेच जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दि. २९/०१/२०२१ रोजीच्या पत्रात भूधारकांचा संपादनास विरोध असल्याचे कळविले आहे.

(३) शेतकऱ्यांचा भूसंपादनास तीव्र विरोध, उपविभागीय अधिकारी, अहमदनगर यांचे विनाअधिसूचित करण्याबाबतचे स्वयंस्पष्ट अभिप्राय व मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे याचिका क्र. ७१८५/२१ दाखल केल्या प्रकरणी मा. न्यायालयाने दि. १०/०२/२०२२ रोजी भूसंपादनाबाबत उच्चाधिकार समितीने निर्णय घेणेबाबत आदेश दिले. मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार उपरोक्त अधिसूचित क्षेत्र विनाअधिसूचित करणेबाबत दि. ०१/०४/२०२२ रोजी उच्चाधिकार समितीच्या १४० व्या बैठकीत दिलेल्या मंजूरीनुसार मौजे वडगांव गुप्ता व पिंपळगाव माळवी येथील संपूर्ण ४६१.७४७४ हे.आर क्षेत्र विनाअधिसूचित करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने संपूर्ण क्षेत्र विनाअधिसूचित करण्याबाबतची अधिसूचना दि. ०३ मार्च, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून, जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना दि. १३/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर विनाअधिसूचित क्षेत्राबाबत महसुली अभिलेखात सुधारणा करुन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती शहरातील जुन्या अमरावती एमआयडीसीतील उद्योग आर्थिक संकटात सापडल्याबाबत

**(१५) ५३७५५ (१८-०१-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरातील जुन्या अमरावती एमआयडीसीमधील अनेक कारखाने हे कोवीडमुळे आर्थिक संकटात सापडले असून दिवसेंदिवस पेट्रोल-डिझेलचे वाढते दर व महागाईचा परिणाम उद्योगांवर पडला असून येथील अनेक उद्योग बंद पडले असल्याचे दिनांक २६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील अनेक उद्योगांशी निगडीत सर्व महत्वाची पदे ही रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही,

अमरावती औद्योगिक क्षेत्रातील मार्च-२०१९ मध्ये ४०१ उद्योग, डिंसेबर २०२१ मध्ये ४१० उद्योग तर सप्टेंबर २०२२ मध्ये ४२० उद्योग उत्पादनात असल्याचे दिसून आले आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अक्कलकोट (जि. सोलापूर) रोड वरील एमआयडीसी मधील विणकर गृह उद्योग व नागनाथ सहकारी संस्थेतील प्लॉट धारकांना मुदतवाढ देण्याबाबत**

**(१६) ५४०१६ (१८-०१-२०२३). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट रोड वरील एमआयडीसी मधील विणकर गृह उद्योग सहकारी संस्थेतील सत्त्याहत्तर प्लॉट धारकांना व नागनाथ सहकारी संस्थेतील सत्तावन्न प्लॉट धारकांना बी.सी.सी. (बिल्डींग कंपलेशन सर्टिफिकेट) देण्यात न आल्यामुळे उद्योगाची वाढ होत नसल्याने या संस्थेतील प्लॉट धारकांना विनाशुल्क मुदतवाढ देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ मार्च, २०२१ रोजी वा त्या सुमारास तत्कालीन उद्योग मंत्री यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने या प्लॉट धारकांना मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर विणकर गृह उद्योग सहकारी संस्था वाटप केलेला भूखंड क्र.सी-२६/१ ते सी-२६/८५ ते सी-३०, क्षेत्र ५०,००० चौ.मी. व नागनाथ लघुउद्योग सहकारी संस्था मर्यादित यांना वाटप केलेला भूखंड क्र.सी-२७ ते सी-३०, क्षेत्र २८, ५०७ चौ.मी. चा विकास कालावधी दि.३०/१०/१९९४ पर्यंत होता.

पुढे प्रदुषणाबाबतचे प्रकरण मा. राज्य मानवी हक्क आयोगाकडे प्रलंबित होते. त्यामुळे दि.०९/०७/२००७ पर्यंत सुधरित विकास कालावधी देण्यात आला आहे. त्यापुढे मुदतवाढीबाबत दाखल केलेल्या प्रस्तावावर भूखंडधारक संस्थेस, आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास मऔवि महामंडळाने कळविले असून त्याबाबतची पुर्तता केलेली नाही.

तसेच सदरच्या भूखंडावरील अनधिकृत बांधकाम काढून भूखंडावरील सुरु असलेला अनधिकृत निवासी व व्यापारी वापर बंद करण्याबाबत भूखंडधारक संस्थेस कळविण्यात आले आहे.

तथापी त्याबाबत सदरच्या दोन्ही भूखंडधारक संस्थेकडून काहीही कळविणेत आलेले नाही. भूखंडधारक संस्थेकडून अनाधिकृत बांधकाम काढलेनंतर व अनाधिकृत वापर बंद केल्यानंतर व कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर मुदतवाढीबाबत म.औ.वि. महामंडळाचे प्रचलित धोरणानुसार निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नळदुर्ग, तामलवाडी व होर्टी, (ता .तुळजापूर) शिराढोण तसेच वाशी तालुक्यामध्ये MIDC च्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्र विकसित करणेबाबत**

**(१७) ५४३६१ (१८-०१-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळजापूर येथील नळदुर्ग, तामलवाडी, होर्टी, कळंब तालुक्यातील शिराढोण तसेच वाशी तालुक्यामध्ये MIDC च्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्र विकसित करणेबाबत दिनांक १७ ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्या सुमारास लोकप्रतिनिधींनी पत्र देवून शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास उद्योग मंत्री यांनी बैठक घेतली होती, हे ही खरे आहे काय?
(३) असल्यास, बैठकीत झालेल्या विषयांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मौजे होर्टी व मुर्टा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथील खाजगी २.०० हे.आर व सरकारी २१६.५५ हे.आर असे एकूण २१८.५५ हे.आर क्षेत्राची मऔवि महामंडळाच्या भूनिवड समितीमार्फत दिनांक ०३.०२.२०२२ रोजी स्थळ पाहणी करण्यात आली आहे. भूसंपादन व जमिनीच्या विकासावर होणारा खर्च विचारात घेता, मोठया उद्योगाच्या मागणीनुसार Pass Through पध्दतीने जमिनीचा कंटूर सर्व्हे केल्यानंतर तज्ञांच्या सल्ल्याने सोलार पार्कसाठी भूसंपादन करणे योग्य राहील असे अभिप्राय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूनिवड समितीने दिले आहे.

सदर सरकारी गायरान जमीन असल्यामुळे महसूल विभागाकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास हस्तांतरण होऊ शकते किंवा कसे याबाबत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचा अहवाल मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त होताच सदर भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तजवीज ठेवली आहे.

नळदुर्ग औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याबाबत मौजे आलियाबाद, ता. तुळजापूर येथील जवळपास ६० हेक्टर खाजगी जमिनीची पाहणी कार्यकारी अभियंता, मऔविम लातूर यांनी दिनांक १६.११.२०२२ रोजी केली आहे. सदर प्रकरणी संबंधित खातेदारांशी प्राथमिक चर्चा करण्यात आलेली असून त्यांनी भूसंपादनासाठी संमती दिलेली नाही.

मौजे शिराढोण, ता. कळंब येथील गोरक्षण संस्था, लातूर यांच्या मालकीची सुमारे १४२.२८ हे.आर जमीन व खाजगी १०७.४५ हे.आर असे एकूण २४९.७३ हे.आर खाजगी जमिनीची व मौजे वाशी, ता. वाशी, जि. उस्मानाबाद येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मौजे वाशी व सरमकुंडी येथील जवळपास ४३३.०७ हे.आर खाजगी जमिनीची मऔवि महामंडळाने दिनांक १७.११.२०२२ रोजी प्राथमिक स्थळ पाहणी केली आहे.

पाहणी केलेल्या जागेचे ७/१२ उतारे , गाव नकाशे तसेच शासकिय कार्यालय वन विभाग, नगर रचना यांचे अभिप्राय इत्यादी आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर पुढील भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत मऔवि महामंडळाने तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धाराशिव (उस्मानाबाद) येथे हवाई धावपट्टीची देखभाल दुरुस्ती व सोई सुविधा निर्माण करणेबाबत

**(१८) ५४३६२ (१८-०१-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रिलायन्स कंपनीकडे देण्यात आलेल्या धाराशिव (उस्मानाबाद) येथील हवाई धावपट्टीची देखभाल दुरुस्ती तसेच तेथे अस्तित्वात असलेल्या इमारतीमध्ये सोई सुविधा निर्माण करणेबाबत दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्या सुमारास लोकप्रतिनिधींनी पत्र देवून शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास उद्योग मंत्री यांनी बैठक घेतली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बैठकीत रिलायन्स कंपनीस विमानतळ परत घेण्याबाबत नोटिस देऊन तसेच MIDC मार्फत विमानतळ विकसित करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने चर्चा झाली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) होय, हे खरे आहे.

सदर बैठकीत मऔवि महामंडळातर्फे विकसीत केलेल्या धाराशिव (उस्मानाबाद) येथील हवाई धावपट्टी देखभाल व दुरुस्तीसाठी मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स प्रा.लि. या कपंनीकडे देण्यात आली होती. परंतू, सदर देखभाल व दुरुस्तीविषयी निश्चिती केलेल्या अटी व शर्तीचा मे. रिलायन्स एअरपोर्ट डेव्हलपर्स कंपनीने भंग केल्यामुळे धावपट्टी पुन्हा मऔवि महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यात यावी, व त्याचा विकास मऔवि महामंडळामार्फत करणेबाबतचा अहवाल सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने मऔवि महामंडळाच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई - दिल्ली इंडस्ट्रियल कॉरिडॉर प्रकल्पासाठी धुळे जिल्ह्यातील जमीन संपादित करण्याबाबत**

**(१९) ५४६६३ (१८-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-दिल्ली इंडस्ट्रियल कॉरिडॉर प्रकल्पात धुळे जिल्ह्याचा समावेश झालेला असून सदर प्रकल्पासाठी भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर (DMIC) प्रकल्पाअंतर्गत पहिल्या टप्प्याकरीता खाजगी ३७१०.९८ हे.आर व सरकारी ३६२.८२ हे.आर तसेच दुसऱ्या टप्प्यात खाजगी १८३३.१८ हे.आर व सरकारी ९१.९१ हे.आर असे एकूण ५९९८.९८ हे.आर क्षेत्रास मऔवि अधिनियम १९६१ अन्वये प्रकरण ६ च्या तरतुदी व सरकारी जमिनीस प्रकरण ६ व खंड २ (ग) च्या तरतुदी लागू करण्यास उच्चाधिकार समितीच्या दिनांक २१.१०.२०११ रोजी ६७ व्या बैठकीमध्ये " सदर भूसंपादनास पाणी आरक्षण उपलब्ध होण्याच्या" अटीवर तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

उच्चाधिकार समितीच्या मंजूरीनुसार प्रथम टप्प्यात खाजगी ३७१०.९८ हे.आर व सरकारी ३६२.८२ हे.आर असे एकूण ४०७३.८० हे.आर क्षेत्राची तसेच दुसऱ्या टप्प्यात खाजगी १८६६.१८ हे.आर व सरकारी ९१.९१ हे.आर असे एकूण १९२५.०९ हे.आर क्षेत्राची प्रकरण ६ ची अधिसूचना निर्गमित करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तथापि, बक्षी समितीच्या शिफारशीनुसार उच्चाधिकार समितीसमोर सादर करावयाच्या विनाअधिसुचित प्रकरणाबाबत दिनांक २४.०१.२०२० रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या १२१ व्या बैठकीत चर्चा करण्यात आली. सदरहू चर्चेत बक्षी समितीच्या शिफारशीनुसार, यापुर्वी अधिसुचित /विनाअधिसुचित करण्यास शासन मान्यता प्राप्त असलेल्या अथवा नसलेल्या प्रकरणांकरीता अंतिम निर्णय घेणे करीता भूनिवड समितीच्या अहवालासह उच्चाधिकार समितीसमोर प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने भूसंपादन कार्यवाही पूर्ण करण्याची तजवीज महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ठेवली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील विस्तारीकरण प्रलंबीत असल्याबाबत**

**(२०) ५७२०३ (२४-०४-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव, जि.बुलढाणा औद्योगिक वसाहत ही विदर्भातील एक मोठी औद्योगिक वसाहत असून सदर औद्योगिक वसाहतीचे विस्तारीकरणाचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१४ पासून ते आजपावेतो सदरची औद्योगिक वसाहत विस्तारीकरण प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
खामगांव येथे २०२.४७ हेक्टर आर जमिनीवर औद्योगिक क्षेत्र विकसीत केले आहे. तेथे ५३४ भूखंडाचे आरेखन करण्यात आलेले आहे.

अतिरिक्त खामगांव औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेसाठी मौजे - सुटाळा (बु), ता. खामगांव जि. बुलढाणा येथील २५४.४६ हे.आर खाजगी क्षेत्रास म.औ.वि. अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ ची अधिसुचना दिनांक ०३ मार्च २०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यापैकी प्रथम टप्प्यात संपादन करावयाच्या १९५.४५ हे.आर क्षेत्रातील एकूण ३४.७० हे.आर क्षेत्रावर पाटबंधारे विभागाच्या जिगांव प्रकल्पाचे पुर्नवसन करीता आरक्षण आहे. सदरचे आरक्षित क्षेत्र हे सलग नसून विखुरलेले आहे. त्यामुळे भूसंपादन कामात अडथळा येत आहे. प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रास सलगता यावी या करीता आरक्षण हटविण्याबाबत शुध्दीपत्रक शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर आरक्षण वगळल्यानंतर पुढील भुसंपादनाची कार्यवाही करणे सुलभ होईल.सदर भूसंपादनाची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर औद्योगिक क्षेत्राचे विस्तारीकरण शक्य होईल.
(३) सदरहू जागेची संयुक्त मोजणीची कार्यवाही पुर्ण झालेली असून संपादनात येणा-या जिगांव प्रकल्पासाठी राखीव असलेल्या जागेचे आरक्षण हटविणे बाबत विभागीय आयुक्त, अमरावती यांना दिनांक १९.१२.२०२२ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यावर विभागीय आयुक्त, अमरावती यांनी त्रुटींची पुर्तता करून पुन:श्च प्रस्ताव पाठविणे बाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना दिनांक ०१.०२.२०२३ रोजी कळविले आहे. सदर प्रकरणी अपर जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन प्रशासक, बुलढाणा मार्फत सदरील आरक्षण वगळणे बाबत महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २३-२९ मार्च २०२३ रोजी प्रकाशित केले आहे. विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे मार्फत व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर यांना पत्र क्र.१५९ दि.१७.०५.२०२३ अन्वये प्रसिध्दीस देण्यात आलेले आहे. सदरचे वृत प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड (जि.पुणे) तालुक्याच्या पूर्व भागात शासनाने घोषित केलेल्या सेझ क्षेत्र बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीवर असलेले सातबाराचे शिक्के काढणेबाबत

**(२१) ५७३१९ (२४-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्याच्या पूर्व भागात शासनाने सेझ क्षेत्र घोषित करून भूसंपादनाचे टप्पा क्र.१,२,३ असे भाग करून टप्पा क्र.२ मधील जमिनीवर असलेले सातबारा शिक्के काढणेबाबत एमआयडीसीने दिनांक २३ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनास फेरप्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे अनुषंगाने सेझ क्षेत्रातील टप्पा क्र.२ मधील जमिनीवरील सातबारा शिक्के काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१),(२) व (३) होय, हे खरे आहे.

खेड विशेष आर्थिक क्षेत्र टप्पा क्र. २ करीता अधिसुचित करण्यात आलेले एकूण २५७९.८९ हे.आर. क्षेत्र विना अधिसुचित करण्याबाबतची अधिसुचना दि.१७/०४/२०२३ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, पुणे यांना शासन पत्र दि.१८/०४/२०२३ रोजी महसूल अभिलेखात दुरुस्ती करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील कल्याण-अहमदनगर राष्ट्रीय महामार्गांच्या दुरुस्तीच्या तसेच प्रलंबित कामांबाबत**

**(२२) ५७६१७ (२५-०४-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-अहमदनगर या राष्ट्रीय महामार्गांचे काम संथ गतीने सुरु असून कल्याण उल्हासनगर येथील सेक्रेड हार्ट शाळेजवळ तसेच शहाड ते म्हारळ, कांबा भागात अनेक ठिकाणी रस्त्याची दुरवस्था झाली असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने येथील ग्रामस्थांनी दिनांक १६ डिसेंबर, २०२२ पासून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाविरोधात चक्का जाम आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी वाहतूक कोंडी व अपघातांच्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन राष्ट्रीय महामार्गाचे काम संथ गतीने करणाऱ्या ठेकेदारावर व त्याला पाठिशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन महामार्गाची दुरुस्ती व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण होण्याच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०७-२०२३) :** (१) होय.

(२) सद्यस्थितीत ठाणे जिल्ह्यातील कल्याण-अहमदनगर या राष्ट्रीय महामार्गांवरील नागरी भागात चालू असलेल्या रुंदीकरणाच्या कामामुळे एकेरी वाहतूक चालू असल्याने वाहतूक कोंडी होते. गृह विभागाकडून प्राप्त अहवालानुसार सदर ठिकाणी ०१ प्राणांकित अपघात दाखल झालेला आहे. वाहतूक कोंडीची माहिती मिळताच महामार्ग पोलीसांकडून वाहतूक कोंडी सोडविली जाते.

(३) संबंधित ठेकेदाराच्या करारनाम्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच रुंदीकरणाचे काम संथ गतीने चालू असल्याने वेळोवेळी कामाची उचित प्रगती राखण्याबाबत कंत्राटदारास सुचना देण्यात आल्या आहेत.

माहे जानेवारी २०२३ मध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांसोबत झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या आदेशानुसार ४९% काम दुस-या कंत्राटदारास देण्यात आले आहे. सद्यस्थितीत महामार्गाचे काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**सोलापूर जिल्ह्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ विभागीय कार्यालय सुरु करणेबाबत**

**(२३) ५७७५८ (२४-०४-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यामध्ये सात ठिकाणी एम.आय.डी.सी. क्षेत्र कार्यरत असून नवीन औद्योगिक क्षेत्र प्रस्तावित असल्याने सर्व औद्योगिक क्षेत्रांसाठी सोलापूर येथे क्षेत्रीय कार्यालय असून त्यांचे विभागीय कार्यालय,सांगली येथे जोडलेले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम.आय.डी.सी.चे विभागीय कार्यालय सध्या सांगली येथे असल्याने सोलापूर ते सांगली १८० ते २०० कि.मी. अंतर असल्यामुळे उद्योजकांना एम.आय.डी.सी. संदर्भातील अडचणी सोडविण्यासाठी तसेच नवीन व्यवसाय धारकांना प्रशासकीय मंजूरीकरीता सांगली येथील कार्यालयात जावे लागते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर येथे एम.आय.डी.सी. चे विभागीय कार्यालय सुरु करणेसाठी लोकप्रतिनिधी,स्थानिक उद्योजक ,महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांनी मागणी केलेली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एम.आय.डी.सी.संदर्भातील अडचणी सोडविणेबाबत तसेच एम.आय.डी.सी. विभागीय कार्यालय सोलापूर येथे सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सोलापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रांचे कामकाज पाहण्यासाठी प्रादेशिक कार्यालय, मऔविम, सांगली अंतर्गत सोलापूर येथे क्षेत्र व्यवस्थापक कार्यालय कार्यरत आहे. सदर कार्यालयामधील क्षेत्र व्यवस्थापक यांना उद्योजकांच्या पोटभाड्यांच्या प्रस्तावास मंजूरी देणे, वित्तीय सहाय्यासाठी संमतीपत्र देऊन त्रिपक्षीय करारनामा कार्यान्वीत करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. तसेच उद्योजकांचे इतर प्रस्तावांबाबत प्रादेशिक अधिकारी, मऔविम, सांगली आठवड्यातून दोन दिवस सोलापूर येथील कार्यालयात उपस्थित राहून कामकाज करीत आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दि.२७/१२/२०२२ रोजी संपन्न झालेल्या ३९४ व्या बैठकीमध्ये बारामती, सातारा, सोलापूर, अहमदनगर, जळगांव, अकोला, चंद्रपूर अशा ७ ठिकाणी नवीन प्रादेशिक कार्यालयांची निर्मिती करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर नवीन प्रादेशिक कार्यालयांची निर्मिती करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील नांदगांव पेठ एम.आय.डी.सी. अंतर्गत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमीनीचा वाढीव मोबदला मिळणेबाबत

**(२४) ५७८८१ (२४-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील नांदगांव पेठ एम.आय.डी.सी. अंतर्गत भु.स.का. २८ अ अंतर्गत १० प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमीनीचा वाढीव मोबदला मिळाला नसल्याने शेतकऱ्यांचा मोबदला मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक ०७ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास उप विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, अमरावती यांना निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी भूसंपादन कायदा कलम २८ अ चे पारीत आदेशातील दर हे मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या दरापेक्षा जास्त असल्याने सदर बाबतीत भूसंपादन कायदा कलम २८ अ अंतर्गत प्रस्ताव लोक अदालतीमध्ये निकाली काढण्याबाबत निर्णय झाला आहे. त्यानुसार दि.०९/०९/२०२३ प्रस्तावित असणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सदरचे वाढीव मोबदल्याबाबत सामोपचाराने दर निश्चिती करून एकत्रित प्रकरणे निकाली काढण्यात येऊन प्रकल्पग्रस्त शेतकरी यांना वाढीव मोबदला तडजोडीनुसार अदा करण्याची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(२५) ५८०२२ (२५-०४-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात जिल्हा व तालुका स्तरावरील उपअभियंता, शाखा अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक इत्यादी अनेक तांत्रिक पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पदे रिक्त असल्यामुळे जिल्हयातील विकास कामे प्रलंबित रहात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-०७-२०२३) :** (१) रत्नागिरी जिल्ह्यात उप अभियंता यांच्या २९ मंजूर पदांपैकी १२ पदे, शाखा अभियंता यांच्या ६४ मंजूर पदांपैकी २५ पदे व स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांच्या ६३ मंजूर पदांपैकी ४८ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) रिक्त पदांमुळे विकास कामांवरील परिणाम विचारात घेता रिक्त असलेली पदे बदली/पदोन्नती तसेच सरळसेवा नियुक्तीद्वारे भरण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कौडगाव (ता. जि. धारशिव) उस्मानाबाद येथील औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्र. २ मधील १००० एकर जमिनीची प्रलंबित भूसंपादन प्रक्रिया सुरू करणेबाबत**

**(२६) ५८०८६ (२४-०४-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौडगाव ता. जि. धारशिव (उस्मानाबाद) येथील औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्र २ मधील १००० एकर जमिनीची प्रलंबित भूसंपादन प्रक्रिया सुरू करणेच्या अनुषंगाने दिनांक १७ ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्या सुमारास लोकप्रतिनिधींनी पत्र देवून शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या औद्योगिक क्षेत्रात भूसंपादनासह रस्ते, विद्युतीकरण, पाणी या सारख्या मूलभूत सुविधा निर्माण करणेबाबत देखील मागणी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.उद्योग मंत्री यांनी बैठक घेतली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बैठकीत झालेल्या विषयांच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कौडगांव औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्र.१ अंतर्गत बांधण्यात आलेल्या २.५ किमी रस्त्यापैकी २ किमी रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. साखळी क्र.३०० मी. ते ६१० मी. आणि ११३० मी. ते १४०० मी. या दोन ठिकाणी संबंधित शेतकऱ्यांच्या विरोधामुळे संपुर्ण रस्त्याचे काम पुर्ण करणे शक्य झाले नाही. सदर अपूर्ण कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी प्राप्त झाली असून, प्रारुप निविदा मंजूरीच्या प्रक्रियेत आहे. तथापि, सदरील कामाचे निविदा प्रसृत करण्यापूर्वी अपूर्ण कामाच्या दोन्ही जागेचा वाद मिटवणे आवश्यक आहे. याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही सुरु असून, सदर दोन्ही जागेच्या वादाचे निरसन झाल्यानंतर निविदा सुचना प्रसिद्ध करता येईल.

(३) होय, हे खरे आहे.

(४) कौडगाव टप्पा क्र. १ मधील गट नं २१७ व २१८ चे शेतकरी यांनी बागायती दराने मावेजा देण्यात यावा म्हणून एका ठिकाणी रस्त्याचे काम थांबविलेले होते. उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, धाराशिव यांनी सदर गटासाठी हंगामी बागायत दराने मंजुर केलेला मावेजा नियमानुसार योग्य व उचित आहे, असे नमुद करुन प्रकरण निकाली काढलेले आहे.

तसेच गट नं २०४ चे शेतकरी यांनी जमीन संपादनातुन वगळण्यात यावी यासाठी रस्त्याचे काम थांबविलेले आहे. सदर गट संपादनातून वगळणेबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी -३ मऔविम, मुंबई यांचे अध्यक्षतेखालील भू-निवड समितीने दिनांक ०३.०२.२०२३ रोजी सदर गटाची स्थळ पाहणी केली

आहे. त्यानुसार सदर गटाचे रस्त्यासाठी लागणारे ०.२० हे. आर. क्षेत्र संपादीत करुन उर्वरीत ६.६४ हे. आर. क्षेत्र वगळण्याबाबत स्थळ पाहणी अहवाल सादर करण्याबाबत भू-निवड समितीची कार्यवाही सुरु आहे.

मौजे. कौडगाव ता. जि. धाराशिव येथे टेक्निकल टेक्स्टाईल पार्क उभारण्यास मंजूरी देण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई यांनी सचिव, वस्त्र मंत्रालय, भारत सरकार, यांना दि. १५.०९.२०२२ च्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब-मोहा-येडशी (जि.उस्मानाबाद) या राज्यमार्गाच्या दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२७) ५८५३९ (२५-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब-मोहा-येडशी (जि.उस्मानाबाद) या ग्रामीण भागातील राज्यमार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झालेली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०६-२०२३) :**(१) व (२)

कळंब मोहा येडशी हा रस्ता राज्यमार्ग २४१ दर्जाचा असून रस्त्याची लांबी ३०.५०० कि.मी. आहे. सदर रस्त्यावर विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत ४.१ कि.मी. लांबीत डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे. तसेच ६.०० कि.मी. लांबीतील रस्ता सुधारणेचे मंजूर कामापैकी ४.५ कि.मी. लांबीतील काम पूर्ण झाले असून उर्वरित लांबीमध्ये खड्डे भरून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

मार्च, २०२२ च्या अर्थसंकल्पात व विशेष दुरुस्ती कार्यक्रम २०२१-२२ मध्ये २१.५५ कि.मी. लांबीत रस्ता सुधारणेचे काम मंजूर आहे. तथापि, सदर काम सद्यस्थितीत सा.बां.विभागाच्या दि.२३/०७/२०२२ रोजीच्या पत्रानुसार स्थगित आहे.

सदर कामाचे पुनर्विलोकन करुन यथायोग्य निर्णय घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सापिर्ली-सिमेचीवाडी ते चोरवणे-डांगेवाडी (ता. खेड, जि. रत्नागिरी) या दोन गावांना जोडणाऱ्या नदीवर पूल बांधण्याबाबत**

**(२८) ५८८९९ (२५-०४-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सापिर्ली-सिमेचीवाडी ते चोरवणे-डांगेवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) या दोन गावांना जोडणाऱ्या नदीवरील

लोखंडी साकव माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यानच्या अतिवृष्टीमध्ये वाहून गेला असून सदर दोन गावांतील नागरिक व विद्यार्थ्यांना नदीच्या पलीकडे जाण्यासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था नसल्याने नदीपात्रातूनच धोकादायक स्थितीत ये-जा करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पूल बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त ठिकाणी पूल बांधण्यास निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-०७-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) सदरचे निवेदन अप्राप्त आहे.

(३) प्रश्नांकित रस्ता हा अवर्गीकृत रस्ता असून तो या विभागाच्या अखत्यारीत येत नसल्याने या विभागामार्फत कार्यवाही करणे प्रस्तावित नाही.

तसेच याठिकाणी साकव बांधण्याचे अंदाजपत्रक तयार केले आहे. तथापि ते साकव बांधकाम मर्यादेपेक्षा जास्त किमतीचे होत असल्याने, भविष्यात हा रस्ता दर्जोन्नत झाल्यानंतर, रस्त्याच्या दर्जानुसार सदर रस्त्याचे काम निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून संबंधित विभागाद्वारे करणे शक्य होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकुरका ते धोत्रा व डिघोळअंबा ते कानडीबदन (ता.केज, जि.बीड) या रस्त्यास क्रमांक देणेबाबत**

**(२९) ५८९४८ (०४-०५-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकुरका ते धोत्रा व डिघोळअंबा (राज्य रस्ता खर्डा-चौसाळा-साळेगाव-माळेगाव) ते कानडीबदन, (ता.केज, जि.बीड) रस्ता अतिवृष्टीमध्ये नादुरुस्त झाला असून सदर रस्त्याला क्रमांक नसल्यामुळे रस्त्याच्या व पुलाच्या दुरुस्तीचे काम करणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सदर दोन्ही रस्त्याला नंबर देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांचेकडे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०७-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय.हे खरे आहे.

(३) डिघोळअंबा ते कानडीबदन (ग्रामा-६३)या रस्त्याच्या सुधारणेसाठी मार्च,२०२३ च्या अर्थसंकल्पामध्ये रु.१५०.०० लक्ष चे काम मंजुर करण्या आले आहे. सदर कामाची निविदा प्रक्रीया पुर्ण करून काम लवकरच हाती घेण्याचे नियोजन आहे. एकुरका ते धोत्रा या अवर्गीकृत रस्त्यास ग्रामीण मार्ग क्रमांक देण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांच्या दि. ०५/६/२०२३ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. प्राप्त प्रस्तावामध्ये शासन परिपत्रक दि.२०/०७/२०१६ अन्वये विहित केलेलया निकषांची पुर्तता होत नसलयाने त्यास अदयाप मान्यता देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**नाशिक शहरातील इंडस्ट्रियल कॉरिडोर प्रकल्पाला मान्यता मिळणेबाबत**

**(३०) ५९०४४ (२४-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडोरचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.उपमुख्यमंत्री व मा.मंत्री उद्योग यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दमणगंगा -एकदरे गंगापूर लिंक व गारगाई-वैतरणा-कडवा-देवलींक या दोन नदी जोड प्रकल्पांना राज्य शासनाने यापूर्वीच तत्वतः मान्यता देऊन या प्रकल्पांमध्ये DMIC नाशिक साठी पाणी आरक्षित केलेले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील औद्योगिक विकासाला अधिक चालना देण्यासाठी नाशिक येथील दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडोर या मेगा इंडस्ट्रीयल पार्कचे काम हाती घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

नाशिक येथील दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडोरचे काम लवकरात लवकर सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.०२/०२/२०२३ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

दमणगंगा एकदरे गंगापुरलिंक येथुन टि.एम.सी. व गारगाई-वैतरणा-कडवा-देवलिंक येथुन ७.१३ टि.एम.सी. या दोन नदीजोड प्रकल्पांमध्ये पाणी आरक्षित करण्यात आले होते.

परंतु सदर प्रकल्पातील आरक्षित पाणी हे नाशिक जिल्ह्यातील प्रकल्पाला अपूर्ण पडत असल्यामुळे सिन्नर तालुक्यातील दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (कडवा-देवनदी) या नदीजोड प्रकल्पातून डी.एम. आय. सी. साठी २३.७३ द.ल.घ.मी. पाण्याचे नियोजन करण्याबाबत शक्यता पडताळणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहे.

(३) नाशिक शहर परिसरात इंडस्ट्रियल कॉरीडॉर प्रकल्पाची उभारणी करणे संदर्भात सिन्नर तालुक्यात अति. सिन्नर टप्पा क्र.२ व ३ मध्ये २१०८.२४ हे. आर क्षेत्र अधिसुचित आहे. त्याकरीता सिन्नर तालुक्यातील औंधेवाडी येथे प्रस्तावित नदी प्रकल्पातून डी.एम.आय.सी. (DMIC) साठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे कार्यकारी अभियंता मऔविम, नाशिक यांनी कळविण्यात आले आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत भुसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मरीन पार्क ते लोटे औद्योगिक वसाहतीसारख्या ठिकाणी मँगो पार्क उभारण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३१) ५९०४७ (२४-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरीन पार्क ते लोटे औद्योगिक वसाहतीसारख्या ठिकाणी मँगो पार्क उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कोकणात आंबे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून जागतिक पातळीवर कोकणातील आंब्याला प्रचंड मागणी असल्याने कोकणात मँगो पार्क प्रकल्पाची उभारणी करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०५-०७-२०२३) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मरीन पार्क स्थापन करण्यासाठी हर्णे (दापोली) येथील क्षेत्राची पाहणी करण्यात आली आहे.

मँगो/कॅश्यु पार्क राज्यात एक पथदर्शी प्रकल्प म्हणून रत्नागिरी जिल्हयात स्थापन करण्यासाठी निवेंडी, रत्नागिरी येथील क्षेत्राची पाहणी करण्यात आली आहे. तसेच या पार्कच्या उभारणीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणेसाठी सल्लागार संस्थेची निवड करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा वनारसी (ता.जि.अमरावती) येथील राज्यमार्ग क्रमांक २९८ या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(३२) ५९१९५ (२५-०४-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा वनारसी (ता.जि.अमरावती) येथील राज्यमार्ग क्रमांक २९८ या रस्त्यावर खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांना जिल्हाधिकारी कार्यालय, निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्र क्रमांक ९७ च्या अनुषंगाने तसेच येथील नागरिकांनी देखील संबंधित यंत्रणेला कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०७-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे.

(२) होय, निवेदन प्राप्त आहे.

(३) राज्यमार्ग क्रमांक २९८ हा साखळी क्रमांक २९-२५० च्या पुढे निम्न पेढी धरणाच्या बुडीत क्षेत्रात गेल्यामुळे रस्त्याच्या पर्यायी संरेखाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. वनारसी गावाजवळ विषयांकित रस्ता वाहतुकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील आंजिवडे-पाटगाव घाटमार्ग कार्यान्वित करण्याबाबत**

**(३३) ५९४०९ (२५-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील आंजिवडे-पाटगाव घाटमार्ग कार्यान्वित करण्याची मागणी कोकणातील घाट माथ्यावरील नागरिकांकडून गत २० वर्षापासून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घाटमार्ग तात्काळ कार्यान्वित करण्यासंदर्भात शासनाने सकारात्मक पावले उचलली नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय आंजिवडे घाट कृती समितीने माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घाटमार्गाचे काम करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-०७-२०२३) :** (१) होय.हे खरे आहे.

(२) आंजिवडे घाट कृती समितीचे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे दिसुन येत नाही.

(३) सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ तालुक्यातील रा.मा.१९० ते दुकानवाड आंजिवडे गवळीवाडी रस्ता ग्रामा-१९० व

गवळीवाडी ते पाटगाव रस्ता (योजनाबाहय) असा एकत्रित रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नत करणेबाबतचा मुख्य अभियंता, सा.बां.प्रा. विभाग, कोंकण यांचा दि. २२/११/२०२२ रोजीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. प्राप्त प्रस्ताव शासन परीपत्रक दि. २०/०७/२०१६ रस्ते दर्जोन्नतीच्या निकषांची पुर्तता करत नसल्याने अदयाप दर्जोन्नती करण्यात आलेली नाही
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील मंचर-बेल्ले सह ७ प्रस्तावित रस्त्यांचे रुंदीकरण व सुधारणेबाबत

**(३४) ५९९३४ (२५-०४-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील मंचर-बेल्ले रस्ता रुंदीकरण, खोडद-नारायणगांव-वारूळगांव ते तालुका हद्द (प्रजिमा क्र.४२), प्रजिमा ४ ते निमगांवसावा-जामुद रस्ता (प्रजिमा ९), आळे-बोरी-शिंगवे रस्ता (प्रजिमा २१), साळवाडी ते बोरीबेल्ला रस्ता (प्रजिमा ८), धोलवड-उंब्रज-पिंपळवंडी-रांजणी रस्ता (प्रजिमा ४), ओतुर-ब्राम्हणवाडा रस्ता (प्रजिमा १४९), आदि ७ रस्त्यांचे रुंदीकरणासह सुधारणेच्या प्रस्तावास राज्य शासनाने निधीची तरतुद करून मान्यता देणेसंदर्भात लोकप्रतिनिधींनी दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर रस्त्यांच्या प्रस्तावित विकासकामांसाठी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात निधीची तरतुद करुन मान्यता देण्याच्यादृष्टीने शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-०६-२०२३) :**

(१) हे खरे आहे.
(२) सदर कामांना सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पामध्ये मंजूरी प्राप्त आहे, तसेच सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये कामांना तरतूद करण्यात आलेली आहे. शासन पत्र दि.२३/०७/२०२२अन्वये सदर कामाना स्थगिती देण्यात आली होती. प्रजिमा-४ ते निमगांव सावा जांबुत रस्ताच्या (प्रजिमा-९) लहान पुलाचे बांधकाम करण्याच्या कामास शासन पत्र दि.११/११/२०२२ अन्वये स्थगिती उठविण्यात आलेली आहे.
उर्वरित कामांचे पुनर्विलोकन करुन यथायोग्य निर्णय घेण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील महापे एमआयडीसीसाठी संपादित केलेल्या भूखंड प्रकरणाबाबत

**(३५) ६०१३४ (२४-०४-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील महापे एमआयडीसीकरिता श्री.रामचंद्र पाटील यांचा एमआयडीसीसाठी भूखंड संपादित प्रकरणी त्यांना मंजूर झालेला १०० चौ.मीटरचा भूखंड त्यांच्या निधनानंतर त्यांचे सहा वारस असतानाही केवळ एकाच श्री.चिंरजीव पाटील या वारसाच्या नावाने भूखंड करुन एमआयडीसीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पाच वारसांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, उक्त भूखंड दलालाच्या माध्यमातून श्री.प्रल्हाद म्हात्रे यास विक्री करुन आर्थिक घोटाळा करुन फसवणूक केल्याप्रकरणी सदरहू भूखंडाच्या वारसांनी एमआयडीसीच्या प्रादेशिक कार्यालयासमोर दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास उपोषण सुरु केले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधितांविरुध्द कारवाई होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) श्री. रामचंद्र पाटील यांचे वारस श्री हरिश्चंद्र रामचंद्र पाटील यांना भूखंड वाटप झालेला असून त्यांनी श्री. तुळशीदास बापू पाटील यांना दिलेल्या कुलमुखत्यार पत्रानुसार भूखंडाचे हस्तांतरण श्री. प्रल्हाद म्हात्रे यांना महामंडळाच्या धोरणानुसार शुल्क वसुल करून करण्यात आले आहे. या कार्यवाहीच्या विरोधात वारसांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यालयासमोर उपोषण केले होते. उपोषणकर्त्याशी महामंडळाने चर्चा करून वस्तुस्थिती अवगत केली. त्यानुसार त्यांनी उपोषण समाप्त केले आहे.

---

## भिगवण (जि.पुणे) तालुक्यातील डिकसळ पुलाची कायमस्वरूपी दुरुस्ती करणेबाबत

**(३६) ६०७५५ (२५-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिगवण (जि.पुणे) तालुक्यातील सुमारे १६५ वर्षे जुना ब्रिटीशकालीन डिकसळ पूल वाहतुकीसाठी धोकादायक झाल्याने बंद करण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होऊन अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलावरील वाहतुक बंद केल्यानंतर किती अपघात झाले व या अपघातामुळे झालेल्या नुकसानीचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणत्या उपायोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही.

सदर पुलास संरचनात्मक नुकसान झाल्याने पुल वाहतुकीस धोकादायक झाला आहे. त्यामुळे दि.१४/०१/२०२३ पासून पूलावरुन सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली आहे.

सदर पुलावरील वाहतुक पर्यायी मार्गाने जात असल्याने वाहतुकीची कोंडी होवून अपघात झाल्याची नोंद नाही.

(२) पुलावरील वाहतुक पर्यायी मार्गाने सुरळीत होत असून अपघात झाल्याची नोंद नाही.

(३) सदर ठिकाणी पर्यायी नवीन पूल बांधण्याकरीता रक्कम रु.५०.०० कोटीचे मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम लवकरच हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील पानशेत पोळे रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३७) ६०८६४ (२५-०४-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील पानशेत पोळे रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरिकांची गैरासोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबकरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) पानशेत ते पोळे रस्त्यावर खालीलप्रमाणे २ रस्त्यांच्या लांबीचा समावेश होतो.

अ) कासुर्डे हातवे तांबाड वेल्हे पानशेत रस्ता प्रजिमा ४२ आहे. सदर रस्ता कि.मी. ५३/३०० ते ५६/०० लांबीचे काम अर्थसंकल्प २०२१-२२ मधून रु.१६६.२५ लक्ष किंमतीला मंजूर असून डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. तसेच कि.मी.५२/१०० ते ५३/३०० लांबीमधील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

आ)प्रजिमा ४२ ते कादवे वडघर घीवशी शिरकोली पोळे माणगाव टेकपोळे हा प्रजिमा १४० आहे. सदर रस्ता कि.मी.००/०० ते ३६/६०० तालुका वेल्हे हा एकूण ३६.६०० कि.मी.लांबीचा आहे. यापैकी कादवे ते वडघर रस्ता कि.मी.००/०० ते ४/२०० लांबीच्या कामास अर्थसंकल्प २०१९-२० मध्ये रु.१६८.०० लक्ष मंजूर असून सद्यस्थितीमध्ये काम पूर्ण झाले आहे. तसेच वडघर ते आंबेगाव खु. रस्ता कि.४/२०० ते कि.मी.८/०० कामास अर्थसंकल्प २०२१-२२ मधून रु.१५०.०० लक्ष किंमतीला मंजूर असून रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. सदर रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

उर्वरित आंबेगाव खु. ते पोळे टेकपोळे रस्ता कि.मी.८/०० ते ३६/६०० लांबीतील खड्डे डांबरीमिश्रीत खडीने भरुन रस्ता वाहुकीस सुरळीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रस्त्यांची नव्याने राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, आणि ग्रामीण मार्ग अशी आखणी करण्याबाबत

**(३८) ६१०९९ (२५-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रस्त्यांची नव्याने राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग, आणि ग्रामीण मार्ग अशी आखणी करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ते, महामार्गांची हद्दनिश्चिती आणि नकाशे याविषयी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्यांची आखणी करण्याकरिता समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व सादर अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ मधील कलम ७ आणि कलम ८ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याकरिता शासनाच्या दि. २३ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांचे अध्यक्षतेखाली रस्त्यांच्या हद्द निश्चित करण्यासाठी कार्यपध्दती अंमलात आणणेसाठी उपाययोजना सुचविणेसाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(४) समितीचा अहवाल अद्याप प्राप्त नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आसनगांव-बोरशेती-अंदाड रस्त्यावरील पूल व काजळविहिर मुहपाडा भातसानदीवरील पूलाच्या बांधकामाबाबत

**(३९) ६१११० (२५-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसनगांव-बोरशेती-अंदाड रस्त्यावरील पूल व काजळविहिर मुहपाडा (ता.शहापूर,जि.ठाणे) येथील भातसानदीवरील पूलाचे बांधकाम करण्याकरिता नाबार्ड योजनेतून निधीची उपलब्धता करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,

(३) असल्यास, सदरहू कामाला केव्हापासून सुरुवात होणार आहे व सदर काम किती कालावधीत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्नाधीन पुलांच्या कामाबाबत शासनाचे निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

## अनुदानित तंत्रशिक्षण संस्थामधील कर्मचाऱ्यांना शासकिय अनुदानातून वेतन व भत्ते मिळण्याबाबत

**(४०) ६११९१ (२५-०४-२०२३). श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठ संलग्नित अशासकिय अनुदानित अभिय महाविद्यालये, तंत्रनिकेतने औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र आणि तास संस्थांना करण्याबाबत शिक्षण व युवा सेवा विभाग शासन निर्णय दि. १८ मे १९७८ मधील अनुदान अदा नियम क्र.२,६,९ व ११ अन्वये कार्यवाही होणे अपेक्षित असले तरी नियम डावलून अनुदान मूल्यनिर्धारण तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे करण्यात येत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शासन निर्णयातील नियम क्र.२ नुसार संपूर्ण खर्चाची जबाबदारी केवळ शासनाचीच असतांना तसेच नियम क्र.९ नुसार संस्थेच्या अंदाजपत्रकातील मान्य खर्चाच्या १० टक्के तुलना प्रत्यक्षात झालेल्या सुटीसोबत पडताळून घेणे अपेक्षित आहे व नियम क्र.११ नुसार संस्थेच्या आर्थिक मंडळाने मंजूर केलेल्या व व्यवस्थापकिय मंडळाने मान्य केलेले अंदाजपत्रक अनुदानाचे मूल्यनिर्धारण करतांना व तदृनंतर अनुज्ञेय अनुदान निश्चित करतांना अंतिम मूल्यनिर्धारण अहवालात विचारात घ्यावे असे अभिप्रेत असतांना तसे प्रत्यक्षात होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, राज्यातील अशासकिय अनुदानित संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ नंतर पूर्ण वेतन मिळत नसून ते त्यांच्या बँक खात्यातही थेट जमा होत नसल्याबाबत गती इवेब संघटनेने तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदय यांना दिनांक ११ जुलै २०१८ रोजी दिलेल्या निवेदनावर तात्काळ चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निदेश देण्यात आले होते. तथापि, त्यासंदर्भात अद्याप कार्यवाही झाली नसल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, डॉ. नंदनवार, सहसंचालक, तं.शि. विभागीय कार्यालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या अशासकिय अनुदानित अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र तसेच तंत्रनिकेतन संस्थामधील कर्मचाऱ्यांना एचटीई सेवार्थ प्रणाली लागू होण्यापूर्वी पूर्ववत संपूर्ण वेतन अदा होण्याच्या दृष्टीने एका समितीचे गठण करून विविध उपाय सुचविणारा स्वयंस्पष्ट चौकशी अहवाल समितीने शासनास सादर केला होता हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तंत्रशिक्षण संचालनालयाव्दारे संस्थाचा अंतिम मूल्यनिर्धारण, अहवाल तयार करतांना दिनांक १८ मे १९७८ नुसार करणे अपेक्षित असतांनाही त्याऐवजी दिनांक ४ सप्टेंबर १९९९ च्या सोयीस्कररित्या लागू करण्याचा

तथापि या शासननिर्णयाला वित विभागाची सहमती नसतानाही नियम क्र. ६ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाने बदल केला असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मा. प्र. सहसंचालक डॉ. नंदनवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत १०० टक्के अनुदान अदा करण्याबाबत विसंगती दूर करण्याची शिफारस करण्यात आली होती याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) असल्यास, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक २१ ऑगस्ट २०१५ रोजीच्या सेवार्थ प्रणाली लागू करण्याच्या शासन निर्णयात परिच्छेद क्र.१० मधील विसंगती दूर करण्यासाठी शुध्दीपत्राचा प्रारूप मसुदा समितीने दिला असतानाही त्यावर अद्याप कार्यवाही झाली नाही याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच १०० टक्के अनुदान लागू करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०५-०७-२०२३) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

गतीवेब संघटनेने दि ११.०७.२०१८ रोजीचे निवेदन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना सादर केले आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.२१ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सर्व संस्थांना वेतन प्रदान करण्यासाठी एचटीई सेवार्थ संगणक प्रणाली लागू करण्यात आलेली आहे. या शासन निर्णयातील परिच्छेद क्र-१० नुसार ९० टक्के अनुदानास पात्र असलेल्या अशासकीय अनुदानित संस्थेतील कर्मचाऱ्यांचे वेतन एचटीई सेवार्थ प्रणालीद्वारे शासन अनुदानातून व उर्वरित १० टक्के अनुदान संस्थास्तरावरुन करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन एचटीई सेवार्थ प्रणालीमार्फत इलेक्ट्रॉनिक पध्दतीने त्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येत आहे.

या धोरणानुसार निश्चित केलेली कार्यपध्दती अद्याप कार्यान्वित असून, त्यामध्ये बदल झालेला नाही.

(४) होय.

(५) नाही.

(६) प्रस्तुत प्रकरणी तत्कालिन सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती व समितीचा अहवाल तंत्रशिक्षण संचालनालयाने शासनास सादर केलेला आहे. तथापि,अनुदान देण्याबाबतच्या शासनाच्या धोरणामध्ये बदल झालेला नाही.

(७) विभागाच्या दि.१९ ऑक्टोबर, १९७७ व दि.१८ मे, १९७८ च्या शासन निर्णयातील अनुदान सुत्राप्रमाणे तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्थांना एचटीई सेवार्थ प्रणालीद्वारे २०१६ पासून अनुदान वितरीत करण्यात येत आहे. सदर धोरणामध्ये बदल करण्यात आलेला नाही.

---

## अहमदपूर ते गंगाखेड (जि.परभणी) या रस्त्याचे चौपदरीकरणाच्या कामाबाबत

**(४१) ६१२०२ (२५-०४-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर ते गंगाखेड (जि.परभणी) या रस्त्याचे चौपदरीकरणाच्या कामाचा प्रस्ताव गत १० वर्षापासून शासनाच्या विचाराधीन असून त्यास अद्याप प्रशासकीय मंजूरी दिली नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूरी देऊन त्वरीत काम सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबड (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीमधील ट्रक टर्मिनल विकसित करण्याबाबत

**(४२) ६१२३६ (२५-०४-२०२३). :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबड (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीमध्ये ट्रक टर्मिनल विकसित करण्यासाठी नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनने दिनांक ३१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास आयुक्त नाशिक महानगरपालिका आणि प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी नाशिक यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत मा.मंत्री उद्योग यांनी अंबड औद्योगिक वसाहतीमधील ट्रक टर्मिनलचा विषय मार्गी लावण्याचे आदेश देवूनही यंत्रणाकडून कार्यवाही करण्यात न आल्यामुळे वाहतुकदारांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंबड (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीमधील ट्रक टर्मिनल विकसित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०४/१२/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत अंबड औद्योगिक वसाहतीत ट्रक टर्मिनस विकसित करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार अति. नाशिक (अंबड) औद्योगिक क्षेत्रात ट्रक टर्मिनस विकसित करण्यासाठी सुविधा भुखंड क्र. एएम-५८ एकुण क्षेत्रफळ ८००० चौ.मी.राखीव करण्यात आलेला आहे व ट्रक टर्मिनस विकसित करणेकरीता रू. ५०७.३५ लक्ष (नक्त) व रू ५८३.४५ लक्ष (ठोक) इतक्या किंमतीस मुख्य अभियंता (औरंगाबाद), मऔविम यांनी दि.१६/०३/२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

त्याप्रमाणे सदर कामाकरीता रू. ४,६९,७८,७१४/- इतक्या न्युनतम रक्कमेच्या निविदेस मंजुरी प्राप्त झालेली आहे. भुखंड क्र. एएम-५८ येथे ट्रक टर्मिनस विकसित करण्याचे काम सुरु करण्याची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घोटी बु., खंबाळे (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील पुलाच्या बांधकामाबाबत

**(४३) ६१५११ (२५-०४-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोटी बु., खंबाळे (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग एनएच-३ वर कॉलमवर (खांब) आधारित उड्डाणपूल बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०७-२०२३) :** (१) होय.

(२) मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र.३ केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

सदर महामार्गावरील घोटी सिन्नर जंक्शन येथे उड्डाणपुलाचे काम हे मॉर्थ स्पेसिफिकेशन फॉर रोड ॲण्ड ब्रीज आणि आयआरसी मानकास अनुसरुन केले जात आहे.
सदरहू पुलाचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्राधिकरणाच्या सक्षम अधिकारी यांनी स्विकृत केला असुन पुलाची संरचना कोडल नॉर्मस नुसार आहे.
सदर निवेदनानंतर पुन्हा सदरहू संरचनेचे पुनर्विलोकन सक्षम प्राधिका-यांनी केले असता सद्य संरचनेत कुठलाही दोष आढळून आला नाही.सदर संरचना पुर्णत: सुयोग्य आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर येथे "लॉजिस्टिक पार्क" सुरू करणेबाबत

**(४४) ६१६८७ (२५-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहर हे राष्ट्रीय महामार्गाने जोडलेले असल्यामुळे सदर ठिकाणी लॉजिस्टिक पार्क उभारण्याची मागणी तत्कालीन लोकप्रतिनिधींनी मा.उद्योग मंत्री यांचेकडे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान केल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार मा.उद्योग मंत्री त्यास संमती देऊन लॉजिस्टिक पार्क सुरु करण्यासाठी जागा शोधण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना सूचनाही दिल्या होत्या हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :**(१), (२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.
कोल्हापूर येथे प्लॉजिस्टिक पार्क स्थापन करण्याकरिता जागा निश्चित करण्याची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, (नवापूर जि. नंदुरबार) येथे सुविधा देणे बाबत

**(४५) ६१९०७ (२६-०४-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योजकांना सुरक्षा देण्यासाठी पोलिस चौक्या उभारणे तसेच पुरेसे पाणी, विज उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्योजकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या एक खिडकी योजनेव्दारे सुधारणा करणे, ट्रक टर्मिनल्स उभारणे, विनावापर पडून असणाऱ्या औद्योगिक जागांचा वापर, औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांच्या हद्दीत साफ-सफाई, अघातक कचरा वेळेत उचलून स्वच्छता ठेवणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
नवापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये पोलिस स्टेशनकरिता भूखंड क्र. पी-२ राखीव ठेवण्यात आलेला आहे. सदर बाबत मागणी केल्यास भूखंड उपलब्ध करुन देता येईल. तसेच नवापूर औद्योगिक क्षेत्रात पुरेसे पाणी व वीज उपलब्ध आहे.
(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या एक खिडकी योजनेव्दारे (Single Window Clearance) भूखंड

मागणी, मुदतवाढ, हस्तांतर, पोटभाडे, भूखंडाचे विभाजन, भूखंडाचे नकाशे मंजूर करणे, नळजोडणी देणे, ना- थकबाकी दाखला देणे, भोगवटा प्रमाणपत्र देणे या सेवा देण्यात येतात. सदर सुविधा महाराष्ट्र शासनाच्या मैत्री कार्यप्रणालीशी संलग्नित करण्यात आलेली आहे.

नवापूर औद्योगिक क्षेत्र ६९.१९ हे.आर क्षेत्रावर विकसीत असल्याने तसेच ट्रक टर्मिनलची मागणी नसल्याने महामंडळाच्या धोरणानुसार वाहनतळ उपलब्ध केलेले नाही.

औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांच्या हद्दीत आवश्यकतेनुसार वेळोवेळी साफ- सफाई, अघातक कचरा उचलून स्वच्छता केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेडकी ते फागणे (ता.नवापूर, जि.नंदुरबार) या राष्ट्रीय महामार्ग क्र.६ चा रस्ता चौपदरीकरणाच्या कामाबाबत**

**(४६) ६१९२९ (२५-०४-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेडकी ते फागणे (ता.नवापूर, जि.नंदुरबार) या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ च्या रस्ता चौपदरीकरणाचे काम बऱ्याच दिवसांपासून संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, संथगतीने सुरु असलेल्या व निकृष्ट दर्जाच्या कामामुळे या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करुन सदर रस्त्याचे काम दर्जेदारपणे व वेगाने होण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०७-२०२३) :** (१) होय.

बेडकी ते फागणे राष्ट्रीय महामार्ग क्र.६ चे चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अखत्यारीत येते.

सदर काम माहे नोव्हें २०१६ मध्ये घोषित करण्यात आले असून कंत्राटदाराने ६५ टक्के काम पूर्ण केले आहे. परंतू कंत्राटदाराच्या आर्थिक संकटामुळे माहे ऑगस्ट २०१९ रोजी काम संपुष्टातआणले व त्यानंतर उर्वरीत काम नवीन कंत्राटदारामार्फत माहे सप्टें.२०२० रोजी सुरु करण्यात आले.सद्यस्थितीत ८६.६५ टक्के उर्वरीत कामाची प्रगती आहे.

(२) हे खरे नाही.

सदर काम हे दर्जेदार व करारानुसार होत असुन पर्यवेक्षण करण्यासाठी ॲथॉरिटी इंजिनीअरची नेमणुक करण्यात आली आहे.गृह विभागाच्या अहवालानुसार सदर रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत नाही.

(३) अनु. क्र.१ व २ नुसार

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ तालुक्यातील शेतकऱ्याच्या ७/१२ वरील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची नोंद कमी करणे बाबत**

**(४७) ६१९३८ (२६-०४-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ७/१२ वर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नोंदी झाल्यामुळे सदर शेतकऱ्यांना २० वर्षापासुन कोणत्याही प्रकारचे शेती संलग्न योजनेचे फायदे मिळत नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची नोंद कमी करण्याची वारंवार मागणी केली जात आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांना न्याय मिळवुन देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :**(१) हे खरे नाही.
प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अन्वये कलम ३२(१) ची अधिसूचना अद्याप निर्गमित झालेली नसल्याने शेती संलग्न योजनेचे फायदे मिळणे बाबत महामंडळाची हरकत असण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(२) हे खरे आहे.
(३) उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांना अधिसूचित जमिनी शेतकऱ्यांच्या संमतीने संपादीत करणे शक्य आहे अथवा कसे याबाबत खातरजमा करणेसाठी खातेदारांसमवेत बैठका आयोजित करण्याची विनंती महाराष्ट्र औद्योगिक विकास मंहामंडळाकडून दि.०३/०९/२०२०, १८/११/२०२०, २०/०७/२०२२ व १८/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि.बीड) येथे अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी विश्रामगृह बांधण्याबाबत

**(४८) ६२३९४ (०४-०५-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि.बीड) येथील विश्रामगृहाची इमारत जीर्ण झाल्यामुळे या ठिकाणी नवीन इमारतीच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी १३३०.२४ लक्ष रुपयांचे अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०६-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
केज (जि.बीड) येथील विश्रामगृहाची इमारत सन १९६६ मध्ये बांधण्यात आली असून त्याची काही दुरूस्ती आवश्यक आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) विश्रामगृहाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निधी, निकष व प्राधान्यक्रमास अनुसरून पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

---

## नवी मुंबई एमआयडीसी परिसरातील रस्त्यावरील ज्वलनशील कंटेनर व टँकरकरिता स्वतंत्र उभारण्यबाबत

**(४९) ६२९९७ (२६-०४-२०२३). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई एमआयडीसी क्षेत्रातील महापे, रबाळे, खैरणे, पावणे, तुर्भे आणि नेरुळ परिसरातील रस्त्यांवर अवजड वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था नसल्याने या परिसरातील रस्त्यांवर दुतर्फा ज्वलनशील ऑईल, गॅस व इतर ज्वलनशील रसायनांचा साठा असलेले टँकर व कंटेनर उभे राहतात हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे एमआयडीसी परिसरातील कंपन्या व रहिवासी वस्तीला धोका उद्भवून शकतो परिणामी हजारो नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याने ज्वलनशील टँकर व कंटेनर हटविण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी एमआयडीसीला लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर निवेदनामध्ये रस्त्यांवर उभ्या असलेल्या ज्वलनशील टँकर व कंटेनरकरिता स्वतंत्र वाहनतळ उभारण्याबाबत देखील मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०४-०७-२०२३) :**(१),(२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने यादवनगर जवळ इलठाण येथे १२,५०० चौ.मी. भुखंडावर व तुर्भे येथे डी ब्लॉक मध्ये ३५,५७८ चौ.मी.भुखंडाचे क्षेत्रावर वाहनतळ उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यानुसार रू.९५९९.९४ लक्ष (नक्त) व रू.११०३९.९३ लक्ष (ठोक) इतक्या रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तांत्रिक मान्यतेनंतर रू. ७०७४.३८ लक्ष किमतीच्या निविदा मागविण्यात आल्या असून सर्वात कमी दराची मे.SPIL यांची निविदा मंजुर करण्यात आली आहे. मे. SPIL यांना पत्र क्र. ए-९३२८५ दि.१६/०३/२०२३ नुसार कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. सदरील कामाची मुदत २४ महीने असून काम पूर्ण होण्याचा कालावधी १५/०३/२०२५ पर्यंत आहे. सद्यस्थितीत दोन्ही भुखंडावर सर्वेक्षणाचे व सिमांकनाचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर-औरंगाबाद या महामार्गावरील विटाळा ते देवगाव रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(५०) ६३०१३ (२५-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर-औरंगाबाद या महामार्गावर विटाळा ते देवगाव या दहा कि.मी.पर्यंत सर्वाधिक खड्डे असून या ठिकाणी भूमिका महादेव समोसे या सहाय्यक शाखा डाकपाल महिलेचा मृत्यू झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील रस्त्यावरचे खड्डे बुजविण्याचा कालावधी संपला तरीही रस्ता दुरुस्त करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मृत महिलेच्या कुटुबियांना शासनाकडून कोणत्या स्वरुपाची मदत देण्यात आली तसेच सदर रस्त्यावरील अपघात रोखण्यासाठी खड्डयांचे सपाटीकरण करणे व रस्ता दुरुस्ती न करणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०५-०७-२०२३) :**(१) होय.
(२) हे खरे नाही. नागपूर-औरंगाबाद या महामार्गावरील विटाळा ते देवगाव रस्त्याचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अखत्यारीत येते. सद्यस्थितीत रस्त्याचे दुरुस्तीचे काम पुर्ण करण्यात आले आहे.

(३) गृह विभागाकडून प्राप्त अहवालानुसार मृत महिलेच्या कुटुबियांना मदत मिळण्यासाठी मा.अध्यक्ष अपघात दावा प्राधीकरण कोर्ट अमरावती येथे माहे फेब्रुवारी २०२३ दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.